सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात "राज्य ई-गव्हर्नन्स कार्यक्रम" या योजनेअंतर्गत रु. ३०.०० कोटी निधी वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: ईगव्ह-२०२६/प्र.क्र.१४६/१३-अे**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०४ सप्टेंबर २०२६

**संदर्भ-** १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. GADIT ०८०/४/२०१४-O/O DIRECTORATE of IT-DIT (MH), दि. ०५.१०.२०२३.
२. प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकींचे इतिवृत्त (दि. २८.०३.२०२५, दि. ०२.०६.२०२५, दि. ११.११.२०२५, दि. २०.०५.२०२६).
३. उच्चाधिकार समिती बैठक इतिवृत्त GAD-मिसं ०६४/५/२०२५-O/ Directorate of IT-DIT, दि. ०४.११.२०२५.
४. शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र. ई-गव्ह-२०२६/प्र.क्र.१४६/१३-अे, दि. ०४.०८.२०२६
५. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०७.०४.२०२६.
६. वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. ३५९/२०२६/व्यय-१, दि. १९.०८.२०२६.

**प्रस्तावना:**

कृषि व पदुम विभागाचे (खुद्द) मंत्रालय तसेच कृषि आयुक्तालय व अखत्यारितील कार्यालयांचे संगणकीकरण बळकटीकरण व्हावे यासाठी "राज्य ई-गव्हर्नन्स कार्यक्रम" ही योजना राबविण्यात येते. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग (खुद्द) व कृषि आयुक्तालयामार्फत ई-गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येतात, तसेच विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात येते. सदर योजनेंतर्गत राज्य शासनातर्फे दरवर्षी ठराविक रक्कम मंजूर करण्यात येते व सदर मंजूर झालेली रक्कम कृषि विभाग (खुद्द) तसेच कृषि आयुक्तालय, पुणे यांना आवश्यकतेनुसार विभागून वितरीत करण्यात येते.

ई-गव्हर्नन्स कार्यक्रम ही योजनांतर्गत योजना आहे. सन २०२६-२७ या वित्तीय वर्षामध्ये सदर योजनेसाठी (३४५१ २७८२) एकूण रु. ७५.०० कोटी (रु. ७५००.०० लाख) निधी अर्थसंकल्पित केलेला आहे. संदर्भ क्र. ४ येथील दि. ०४.०८.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये राज्य ई-गव्हर्नन्स कार्यक्रम राबविण्यास १५ विविध बाबींकरिता रु. ७५००.०० लाख रकमेच्या मर्यादेत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. ६ येथील सहमतीनुसार मंजूर निधीपैकी पहिल्या टप्प्यात उपलब्ध निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:**

१. सन २०२६-२७ या वित्तीय वर्षामध्ये "राज्य ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (कृषि)" ची अंमलबजावणी करण्याकरिता रु. ३०.०० कोटी (रुपये तीस कोटी फक्त) निधी कृषि आयुक्तालय, पुणे यांना याद्वारे वितरीत करण्यात येत आहे.

२. याद्वारे वितरीत रु. ३०.०० कोटी (रुपये तीस कोटी फक्त) निधी खालील लेखाशीर्षांतर्गत सन २०२६-२७ करिताच्या अर्थसंकल्पित तरतूदीमधून खर्ची टाकावा:

मागणी क्र. डी-७
३४५१- सचिवालय- आर्थिक सेवा,
पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
(०२) योजना, (०२) (०४) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम अंमलबजावणी (कृषि)
(३४५१ २७८२), १७- संगणक खर्च

३. सदर शासन निर्णयान्वये वितरीत निधी कोषागारातून आहरण व वितरण करण्यासाठी आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना 'नियंत्रण अधिकारी' व सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना 'आहरण व संवितरण अधिकारी' म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र. ३५९/२०२६/व्यय-१, दि. १९.०८.२०२६ आणि वित्त विभागाचे संदर्भाधिन शासन परिपत्रक अर्थसं-२०२६/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०७.०४.२०२६ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९०४१११२४८१६४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SMITA PRASAD JOSHI
Date: 2026.09.04 11:14:05 +05'30'

**( स्मिता जोशी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

५. अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. सर्व विभागीय सहसंचालक (कृषि) (ठाणे, पुणे, अमरावती, कोल्हापूर, लातूर, नागपूर, छ. संभाजीनगर, नाशिक).
९. प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / संबंधित सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
११.सर्व उपविभागीय कृषि अधिकारी (संबंधित).
१२.निवड नस्ती-१३-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय. मुंबई.
१३.उप सचिव/सह सचिव, वित्त विभाग (व्यय-१/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई.
१४.उप सचिव, कार्यासन २- अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१५.निवड नस्ती-१३-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय. मुंबई.